# बोदवड महाविद्यालयाचा विनोद नेरकरची वजन उचलणे व शक्ती तोलन विभागीय स्पर्धेसाठी निवड.

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय बोदवडचा खेळाडू विनोद प्रल्हाद नेरकर याने दि.०४/१०/२०१८ रोजी व्ही.एस.पाटील महाविद्यालय रावेर येथे जळगाव विभाग अंतर्गत आंतर महाविद्यालयीन स्पर्धेत वजन उचलणे व शक्ती तोलन या क्रीडा प्रकारात आपल्या वजन गटात प्रथम स्थान प्राप्त केल्याने त्यांची कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ अंतर्गत आयोजित विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. सदर स्पर्धा दि.११/१०/२०१८ ते १२/१०/२०१८ या कालावधीत धनाजी नाना महाविद्यालय फैजपूर येथे संपन्न होणार आहे त्यास डॉ.किशोर पाठक यांचे मार्गदर्शन लाभले त्यांना प्राचार्य डॉ.अरविंद चौधरी, उपप्राचार्य देवसिंग पाटील, संस्थेचे सर्व पदाधिकारी अध्यक्ष मिठूलालजी अग्रवाल, उपाध्यक्ष अजयजी जैन, सचिव विकासजी कोटेचा सर्व जिमखाना कमिटी सदस्य यांनी अभिनंदन करून पुढील स्पर्धेस सुभेच्छा दिल्या.



